(21)

Rayat Shikshan Sanstha's

# Sadguru Gadge Maharaj College, Karad

**(An Empowered Autonomous College)**

12511

**SGMCK**

(AN EMPOWERED AUTONOMOUS COLLEGE)

**Information to be filled by Student**
**(विद्यार्थ्याने भरावयाचा रकाना)**

Day and Date : Thursday, 06-11-2025

Language of Answer : Marathi

Examination : M.A. Part - II History (NEP 2023) Oct./Nov. 2025 Examination.

Question Paper Code No. : N-HIST-M3

Subject : Contemporary World (1950 - 1991)

Paper No. -

Secion : -

**(Office [redacted]**

| Q. No. | Examiner Marks | Moderator Marks |
|---|---|---|
| 1 | 20 | |
| 2 | 19 | |
| 3 | 20 | |
| 4 | 18 | |
| 5 | | |
| 6 | | |
| 7 | | |
| 8 | | |
| 9 | | |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| Total | 77 | |
| Signature | | |

Q. C. - O. K.

## IMPORTANT

As per Maharashtra Act No. XXXI of 1982 (7 & 8) whoever is found in or near an examination hall by the invigilator or any therperson appointed to supervise the conduct of the examination, copying answers to the question paper set at the xamnation, from any book, notes or answer papers of other candidates, of appearing at the examination for any other andilates or using any other unfair means, shall, on conviction, be punished with imprisonment for a term which may xtenl to six months, or with fine which may extend to five hundred rupees or with both.

Whoever abets any offence punishable under this Act shall be punishable with the punishment provided for the offence.

सूचना विद्यापीठ नियमानुसार जो कोणी परिक्षा हॉलजवळ किंवा हॉलमध्ये पर्यवेक्षकांना किंवा परीक्षेसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना उत्तरांची पुस्तक नोट्स किंवा अन्य विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेतून नक्कल करताना आढळून येईल किंवा जवळ परीक्षा गैरव्यवहारासाठी वापरता येईल असे अक्षेपार्ह साहित्य बाळगत असेल तर सदरची बाब परीक्षा प्रमाद मानून संबंधित व्यक्ति शिक्षेस पात्र राहील.

## महत्वाच्या सूचना

१. उत्तरपत्रिकेमध्ये अन्यत्र कोठेही बैठक क्रमांक (दिलेल्या जागेखेरीज) लिहू नये, तसेच अन्यत्र कोणत्याही प्रकारच्या खुणा करू नये अशा खुणा आढळल्यास तो ओळख पटविण्याचा प्रयत्न मानन्यात येईल व असा परीक्षा प्रमाद शिक्षेस पात्र राहील.
२. उत्तरास प्रश्न क्रमांक व उपप्रश्न क्रमांक लिहणे अनिवार्य आहे.
३. पूर्ण प्रश्नांचे उत्तर सलग व सुवाच्य अक्षरात लिहावे.
४. अवाचनीय अक्षरातील उत्तर शुन्य गुणासाठी ग्राह्य मानण्यात येईल.
५. आकृत्याखेरीज सर्व उत्तरासाठी फक्त निळ्या शाईचा वापर करावा.

## IMPORTANT

1. Do not write seat number anywhere except at the space provided for it. If seat number or any marks, symb which indicates identity is/are found anywhere, it will be treated as malpractice and lapse. Such malpractice lapse will be punishable under Maharashtra University Act 1994.
2. It is necessary to write the Question No. and sub Question Number before answer.
3. Write the complete answer in sequential manner and then start the next question in readable handwriting.
4. Answer in an illegible & undecipherable handwriting are liable to be marked as zero.
5. Use of blue color ink (expect diagrams) is permitted.

| Q. No. | Verificaton Marks | Revaluation M |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| 7 | | |
| 8 | | |
| 9 | | |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| Total | | |
| Signature | | |

| Q. No. | 1 | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | 20 | — | — | 20 | | | | |

| Q. No. | |
|---|---|
| प्र.१) | |
| १) | अलिप्त राष्ट्र चळवळीतील नेते गेमार अब्दिल नासीर हे इजिप्त या देशाचे होते. |
| 2 | |
| २) | संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कामकाज हॉलंड या देशातून चालते. |
| 2 | |
| ३) | नेल्सन मंडेला यांचा जन्म कुनू येथे झाला. |
| 2 | |
| ४) | पृथ्वीवरील काळे खंड म्हणून आफ्रिका ला ओळखले जाते. |
| 2 | |
| ५) | द. व्हिएतनाममधील सैगॉन या शहराचे नाव बदलून हो चि मिन्ह सिटी ठेवले आहे. |
| 2 | |
| ६) | संयुक्त राष्ट्रसंघाचे मध्यवर्ती कार्यालय न्युयॉर्क या देशात आहे. |
| 2 | |
| ७) | बोअर युद्ध इंग्लंड यांनी जिंकले. |
| 2 | |
| ८) | इ.स. १९४५ ला दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला. |
| 2 | |

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

Q. No.

९) OPEC ची स्थापना बगदाद या ठिकाणी झाली.

२

१०) व्हिएतनाममध्ये हो चि मिन्ह या नेत्याला राष्ट्रपित्य चा दर्जा आहे.

२

२

| Q. No. | 2 | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | 19 | — | — | 19 | | | | |



Q. No.

प्र.२)

१) डिस्को संगीतशैली -

डिस्को संगीतशैली ही नृत्याची एक प्रसिद्ध शैली / प्रकार असून ती अमेरिका देशातील न्युयॉर्क या शहरात १९७० च्या दशकाच्या काळात मोठ्या प्रमाणात उदयास येवून प्रसार पावली होती.

अमेरिकेतील तळागाळातील, उपेक्षित लोक, कृष्णवर्णीय लोक, वंशवादाला बळी पडलेले लोक समलैंगिक समुदाय (LGBTQ+) या वर्गात डिस्को संगीत शैली मोठ्या प्रमाणात प्रचलित होती.

उपेक्षित वर्गाचा व्यक्त होण्याचा भावना, व्यक्त करण्याचा, मते मांडण्याला, तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा डिस्को संगीतशैली आधार मानन्यात आले होते.

I will Survive सारख्या लोकप्रिय गाण्यातून डिस्कोची लोकप्रियता प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचली असून अमेरिकेतील आर्थिक आणि राजकीय अस्थिरतेचा प्रभाव यावर पडला.

१९७९ मध्ये Disco Demolition Night च्या वेळी अनेक डिस्को क्लब बंद पाडण्यात येवून नंतर तिला प्रभावहीन करण्यात आले.

वरवर व्यावसायीकरणातून करण्यात आलेला Disco Demolition Night चा प्रकार हा वर्णभेद, वंश-द्वेषातून करण्यात आल्याचे उघडकीस आले.

१९८० च्या काळात डिस्कोच्या जनमानसावरील प्रभाव ओसरला मात्र या डिस्को संगीत शैलीतून आजच्या Electronic Dance Merchadise आणि क्लब संस्कृतीचा पाया घातला गेला.

०५

Q. No.

२) आंग सान स्यू की -

आंग सान स्यू की या म्यानमारमधील प्रमुख महिला नेत्या असून म्यानमारमधील जनतेवर त्यांचा मोठा पगडा आहे.

म्यानमारमधील कार्य -

- १९८८ मध्ये परदेशात शिक्षण घेवून परत आल्यानंतर त्यांनी देशात लोकशाही स्थापन करून स्वातंत्र्य, समता मूल्यांधारित लोकशाही निर्माण करण्यासाठी Democratic Party ची स्थापना केली.

- Democratic Party च्या वाढत्या प्रतिसादाला घाबरून लष्कराने आंग सान स्यु की यांना नजरकैदेत टाकले. कार्ल मार्क्स आणि महात्मा गांधी यांच्या प्रभावामुळे त्यांनी अहिंसेचा मार्ग निवडला.

- १९९१ मध्ये त्यांना शांततेचा नोबेल जाहीर झाला. त्यांनी तो देशवासीयांना समर्पित केला. त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळून मोठे समर्थन प्राप्त झाले.

- २०१० ला त्यांनी नजरकैद संपल्यानंतर सक्रीय राजकारणात भाग घेतला. २०१५ ची सार्वत्रिक निवडणुक त्यांचा पक्ष बहुमताने जिंकला. संविधानातील नियमामुळे त्यांनी सल्लागाराचे पद स्वीकारून कार्य केले.

- २०१७ मध्ये रोहिंग्या - बौद्ध संघर्षात त्यांच्यावर

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

Q. No.

आरोप करून त्यांना बदनाम केले गेले

२०२१ साली गैरकारभाराचा ठपका ठेवून लष्करी न्यायालयाने त्यांना ३३ वर्षांची जन्मठेप सुनावली आहे. त्यांनी तुरुंगातून शांतता आणि अहिंसेच्या मार्गाने आपला लढा सुरु ठेवला आहे.

SADGURU GADGE MAHARAJ COLLEGE, KARAD

Q. No.

३) शीतयुध्द संकल्पना -

१९४५ नंतर जुन्या वसाहतवादी राष्ट्रांच्या शक्ती खच्चीकरण आल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी दोन देशांत संघर्ष उफाळून येवून शीतयुध्द सुरु झाले.

- १९४५ मध्ये द्वितीय महायुध्दाच्या समाप्तीनंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी अमेरिका आणि रशियात संघर्ष उफाळून आला, त्याचे पर्यावसान हे शीत युध्यात झाले.
- शीतयुध्दाची बीजे दुसऱ्या महायुध्दांतील अनेक घटनांमुळे पेरली जावून युध्दानंतरच्या तहांतून, त्याला खतपाणी मिळाले गेले.
- अमेरिकेतील भांडवलशाहीचे तोटे दाखवून त्याला प्रतिस्पर्धी असणारी साम्यवादी क्रांती रशियात घडून आली. रशियाने बाल्कन करार भंग केला आणि पुर्व युरोपात साम्यवादाची लाट आली.
- साम्यवादाला विरोध करुन त्याविरुध्द भांडवलशाहीने आपले दंड थोपटले. जगातील राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्याचे प्रयत्न सुरु झाले.
- विविध सुरक्षा करार केले गेले, शस्त्रास्त्र स्पर्धा, अण्वस्त्र स्पर्धा सुरु झाली. संपूर्ण जगच युध्दभूमी बनले गेले.

Q. No.

- एकमेकांविरोधात अपप्रचार, चुकीची माहिती, हेरगिरी यांसारखे कार्यक्रम राबविण्यात आले.

- दोन राष्ट्रांतील लोकांच्या मनात हे युद्ध खेळले जाऊन दोन राष्ट्रांत द्वेष वाढीला लागला. या युद्धाचे परिणाम प्रत्यक्ष युद्धापेक्षाही भयंकर व भीषण होते.

- संयुक्त राष्ट्रसंघ कुचकामी ठरला, जगातील शांततेचे स्वप्न धुळीस मिळून जग तिसऱ्या महायुद्धांच्या उंबरठ्यावर ओढले गेले.

- शीत युद्धातूनच तिसऱ्या जगाच्या निर्मितीला चालना मिळाली व अलिप्ततावाद उदयास आला.

08

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |



Q. No.

ब) नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन (NATO) -

- १९४५ ला दुसरे महायुद्ध संपल्यानंतर १९४९ साली वॉशिंग्टन येथे १२ राष्ट्रांनी मिळून अमेरिकेच्या नेतृत्वात करार करून NATO ची स्थापना केली.

- NATO च्या स्थापनेनंतर पश्चिम अटलांटिक सागर-किनारपट्टीवरील देशांवरील आक्रमणांना अमेरिका विरोध करेल, हा हेतू ठेवला गेला.

- १९४९ ला [redacted] २० वर्षासाठी केलेला हा करार २० वर्षासाठी पुन्हा वाढविण्यात आला. त्यानंतर १९८९ साली दर १० वर्षांनी या कराराचा पुर्नविचार केला जातो.

- NATO मुळे अनेक देशात लष्करी व क्षेपणास्त्र तळ उभारले गेले. पुढे युरोपीय देश अमेरिकेच्या सरक्षणाखाली आले.

- European Command, North Atlantic Command, Channel Command, U.S.A. - Canada Command ही चार प्रमुख केंद्र आहेत.

- Supreme Commander of Allied Force हे NATO चा प्रमुख लष्करी अधिकारी असून SHAPE या नावाचे फ्रान्स मध्ये Rocken Court येथे याचे लष्करी कार्यालय आहे.

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |



No.

⊙ प्रतिनिधी सभा, उपप्रतिनिधी सभा आणि लष्करी परिषद या NATO च्या तीन प्रमुख सभा आहेत.

⊙ "शक्तीशाली साम्राज्यवादी राष्ट्रांचा आक्रमक गट" या नावाने रशियाने NATO वर टिका केली होती.

5

| Q. No. | 3 | | | TOTAL | | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | 20 | ——— | | 20 | | | | | |



Q. No.

प्र. ३)

१) हो चि मिन्ह यांचे व्हिएतनाम मधील कार्य -

हो चि मिन्ह हे व्हिएतनाममधील अत्यंत प्रसिद्ध असे राष्ट्रवादी नेते होते, त्यांच्या नेतृत्वात व्हिएतनामचे स्वातंत्र्य युद्ध आणि एकीकरणाचे युद्ध लढले गेले.

- हो चि मिन्ह यांनी व्हिएतनाम मधील फ्रेंच राजवटील जोरदार विरोध केला. त्यांनी Vietnam Democratic Party पक्षाची /संघटनेची स्थापना केली.

- दुसऱ्या महायुद्धात फ्रेंचाचा पराभव करुन जपानने व्हिएतनामवर ताबा मिळवल्यानंतर त्यांनी जपानला विरोध करुन स्वातंत्र्यप्राप्तीसाठी संघर्ष करुन भूमिगत राहून कार्य केले.

- दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर व्हिएतनामने आपले स्वातंत्र्य जाहीर केले, तेव्हा फ्रान्सने पुन्हा आक्रमण करुन व्हिएतनामवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला.

- १९५४ साली डिएन बिएन फू च्या युद्धात फ्रेंचाचा निर्णायक पराभव होवून दक्षिण व्हिएतनाम व अमेरिकाच्या समर्थनासह उत्तर व्हिएतनाम अशी दोन राष्ट्रे उदयास आली.

- दक्षिण व्हिएतनाममध्ये हो चि मिन्ह यांच्या नेतृत्वात समाजवादी क्रांती घडून आली, अमेरिकेचा

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

| No. | |
|---|---|

७ आर्थिक मदत नाकारल्यानंतर अमेरिकेने दक्षिण व्हिएतनाम वर निर्बंध घातले तेव्हा व्हिएतनामच्या एकीकरणासाठी उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाम-मधील लोकांना होची मिन्ह यांनी प्रेरित केले.

Q. No.

२) हिप हॉप संगीत शैली-

• १९८० च्या दशकात डिस्को संगीतशैलीचा प्रभाव कमी होत चालला असतानाच उपेक्षित समुदायांत Hip Hop या शैलीचा उदय झाला. हा एक नृत्य प्रकार आहे.

• अभिव्यक्ती स्वातंत्र्याची चळवळ या नजरेतून या Hip Hop चा मोठ्या प्रमाणात प्रचार आणि प्रसार करण्यात आला. जनमानसात याचा मोठा पगडा निर्माण झाला.

• आपली मते मांडण्याचा, भावना व्यक्त करण्याचे साधन म्हणून याचा वापर केला जाऊ लागला.

• The Grandmaster, J-Z, Suprek अशा कितीतरी कलाकारांमुळे हिप हॉपची लोकप्रियता वाढत गेली भारतात उषा उत्थुप हे हिप हॉप मधील लोकप्रिय नाव आहे.

• आजच्या दशकात Eminem, kayne west, Snoop dog इ. कलाकार यांमुळे Hip Hop चे आजही जनमानसावर गारुड आहे.

• आजच्या काळात Hip Hop केवळ नृत्य प्रकार नसून पोशाख, आहार, खानपान, राजकारण, समाजव्यवस्था, संस्कृती यांवर प्रभाव असलेला एक मोठा घटक आहे.

Q. No.

⊙ ५० वर्षांनंतर ही Hip Hop अजूनही तितकाच लोकप्रिय व प्रभावशाली घटक असलेला आपल्याला दिसून येतो.

Q. No.

ब) शीतयुद्धाची कारणे -

शीतयुद्धाची बीजे दुसऱ्या महायुद्धातील अनेक घडामोडी आणि महायुद्धानंतरच्या घडामोडीत रोवली गेली होतीत.

⊙ सत्ता पोकळी -

आंतरराष्ट्रीय राजकारणातील पोकळी भरुन काढून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला दबदबा निर्माण करण्याची स्पर्धा यातून शीत युद्धाला पोषक वातावरण तयार झाले.

⊙ अविश्वास -

दुसऱ्या महायुद्धादरम्यान दोस्त राष्ट्रे रशियाला संशयाच्या नजरेतून पाहत. अनेक निर्णय हे रशियाकडून किंवा रशियाला अंधारात ठेवून घेतले गेले. झेकोस्लोव्हाकियाचे भविष्य, हिटलर विरुध्द उशिरा उघडलेली रशियातून आघाडी, त्यातून रशियाचे झालेले नुकसान इ. गोष्टीतून राष्ट्रांतील दुरावा वाढत गेला. अणू बॉम्बबद्दल रशियाला अनभिज्ञ ठेवण्यात आले होते.

⊙ विस्तारवादी धोरणे -

दोन महासत्तांच्या विस्तारवादी धोरणातून एकमेकांच्या हितसंबधांना धक्के बसत जावून ताठर धोरणामुळे दरी रुंदावत गेली.

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

Q. No.

⊙ साम्यवाद -

साम्यवादी क्रांतीतून भांडवलशाहीला धोका निर्माण झाला. परस्पर विरोधी विचारसरणीतून एकमेकाबद्दल अविश्वास संशय वाढीला लागला. राष्ट्राच्या एकमेकाच्या गटात ओढण्याच्या स्पर्धेतून वाद वाढत गेले.

⊙ लष्करी करार -

विविध लष्करी करार, शस्त्रास्त्र स्पर्धा यातून तणाव वाढत गेला.

⊙ करारभंग -

रशियाने बाल्कन व याल्टा करार भंग करून अनेक देशात साम्यवादी सरकारे स्थापन केली, पूर्व युरोपात साम्यवादाची लाट आली, त्यातून शीत युद्धाला प्रत्यक्ष तोंड फुटले.

रशिया आणि दोस्त राष्ट्रांतील बेबनाव, अविश्वास संशयातून शीतयुद्धाला चालना मिळत गेली.

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

Q. No.

६) दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपची आर्थिक पुनर्रचना -

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपचे मोठे नुकसान झाले होते, त्यातून उभारी घेवून युरोपची पत पुन्हा सुधारली, त्यात आर्थिक पुनर्रचना महत्वाचा घटक असून त्याबद्दल आता आपण जाणून घेवूयात.

① मार्शल योजना -

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष मार्शल यांनी तयार केलेल्या मार्शल योजनेमुळे युरोपीय राष्ट्रांना आर्थिक साहाय्य, तंत्रज्ञान सहाय्य प्राप्त झाले, राष्ट्रांतील आर्थिक ताण कमी झाला. आर्थिक आणि तांत्रिक मदतीमुळे अन्न धान्य टंचाईला तोंड देणाऱ्या युरोपची टंचाई मुक्ती करता आली, आपली स्थिती सुधारता आली

② Bank For Internal settlement -

Bank For Internal Settlement च्या स्थापनेमुळे युरोपीयन देशांच्यात आर्थिक देवाणघेवाण सहकार्य मदत या गोष्टी वाढीस लागून युरोपात सहकार्याचे वातावरण निर्माण झाले.

③ NATO -

NATO मुळे युरोपीय राष्ट्रांना संरक्षणासाठी जास्त खर्च करावयाची गरज भासली नाही, त्या निधीचा उपयोग करून देशांतर्गत पायाभूत सुविधांचा पुनर्विकास करण्यात आला. NATO मुळे युरोपीयन देश अमेरिकेच्या संरक्षणात येवून धोक

Q. No.

उरला नाही.

⊙ Union For Coal & steel -

१९५१ साली Union For coal & steel ची स्थापना करुन औद्योगिक पायाभूत सुविधा, उद्योगधंदे यांचा मोठा प्रमाणात विकास करण्यात आला.

⊙ पश्चिम जर्मनी -

युरोपीयन देशांत NATO च्या मदतीने होणारी जर्मनीच्या विकासाची गती यातून पोषक वातावरण वाढत जावून राष्ट्रातील सहकार्य आणि देवाणघेवाण, व्यापार यात वाढ झाली.

⊙ USSR विघटन -

U.S.S.R विघटनानंतर पूर्व युरोपातील साम्यवादाची लाट ओसरुन अनेक राष्ट्रांत लोकशाही स्थापन होवून भांडवलशाहीच्या जोरावर युरोपात जोरदार प्रगती सुरु झाली.

08

20

| Q. No. | ५ | अ | ०१ | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | ०९ + ०९ = १८ | | | | | | |



प्र.५)

अ) **अमेरिका स्त्रीवादी चळवळ -**

⊙ १८७९ मध्ये लिंडन या शास्त्रज्ञाने स्त्रीवाद या शब्दाचा प्रथम वापर केला आणि अमेरिकेतच स्त्रीवादा अभ्यास सर्वप्रथम सुरु झाला.

⊙ स्टॅनन या स्त्रीवादी नेत्याने स्त्रीयांचा एक मोठा मेळावा भरवून स्त्रीवादाला व्यापक रूप प्राप्त करून देवून स्त्रीवादीचा प्रसिद्ध स्टॅनन जाहीरनामा प्रसिद्ध केला.

⊙ स्त्रीवादाचे अमेरिकेत प्रामुख्याने पुढील दृष्टिकोन हे उदयास आले.

१) उदारमतवादी स्त्रीवाद
२) समाजवादी स्त्रीवाद
३) मार्क्सवादी स्त्रीवाद
४) जहालवादी स्त्रीवाद
५) कृष्णवर्णीय स्त्रीवाद
६) परंपरावादी स्त्रीवाद
७) अस्तित्ववादी स्त्रीवाद

⊙ Barbara Smith यांनी National Organisation For Women (Now) ची स्थापना करून स्त्रीवादी चळवळीला स्त्री मुक्ती चळवळीचे व्यापक स्वरुप प्राप्त करून दिले.

⊙ स्त्रीया १९१० पर्यंत पुरुषांच्या इतक्याच सर्वच क्षेत्रात कार्य करावयास लागून त्यांचे प्रमाण ५०%.

Q. No.

वर पर्यंत पोहोचले गेले. पुढील दोन दशकांत स्त्री याचे प्रमाण पुरुषांपेक्षा सर्वच रोजगार क्षेत्रात वाढलेले दिसून आले.

० स्त्रीयांच्या हक्कासाठी विविध मागण्या जोर धरत गेल्या. ॲलिस वॉकर, Barbara Smith, कायरस्टोन, ग्रीअर, केट मिलेट, इ. स्त्रीवादी कार्यकर्त्यांमुळे चळवळ अधिक व्यापक होवून ती लोकप्रिय झाली.

० स्त्री वादी संघटनांच्या विविध मागण्याला पुरुष वर्गाने पाठिंबा देवू केला. परिणामतः स्त्री वादी चळवळ प्रभावी बनली.

० १९९० मध्ये १९ वी घटना दुरुस्ती करुन स्त्रीयांना मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला.

० अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळ यशस्वी होण्यामागे प्रशासनातील आणि सर्व क्षेत्रांतील असणारा स्त्री सहभाग, जागृती आणि जाणीव आणि पाठिंबा, समर्थन ह्या गोष्टी प्रामुख्याने जबाबदार असल्याचे दिसून येत.

० <u>परिणाम</u>.

१) स्त्रियांच्यात आपल्या हक्कांबद्दल जागृती निर्माण झाली.

२) पुरुषांइतकेच समान अधिकार प्राप्त झाले.

३) कायद्याचे संरक्षण स्त्रीला प्राप्त झाले.

| Q. No. | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | |

Q. No.

| स्त्रीवाद | तत्त्वज्ञान |
|---|---|
| १. उदारमतवादी स्त्रीवाद | हक्क, अधिकार, समानता मागणी, स्त्री-मुक्तीतून पुरुष मुक्ती (शोषणातून मुक्ती). |
| २. मार्क्सवादी स्त्रीवाद | मार्क्सवाद, रोजगारात, वेतनात समानता. |
| ३. समाजवादी स्त्रीवाद | उदारमतवादी आणि मार्क्सवादी स्त्रीवाद-चा संगम, समाजवादी क्रांतीतून स्त्री मुक्ती. |
| ४. जहालवादी स्त्रीवाद | पुरुषच सर्वस्वी जबाबदार, जैविक क्रांतीची मागणी. |
| ५. कृष्णवर्णीय स्त्रीवाद | कृष्णवर्णीय स्त्रीच्या समस्यांकडे लक्ष. |
| ६. अस्तित्ववादी स्त्रीवादी | नवीन प्रकारे स्त्रीयांचे योगदान समजून घेवून योग्य सन्मान. |
| ७. परंपरावादी स्त्रीवाद | परंपरा, राष्ट्र, वंश, जात धर्म यांचे स्त्री दृष्टिकोनातून स्वरूप. |

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

Q. No.

प्र.४)

ब) गेमार अब्दुल नासीर यांचे इजिप्तच्या विकासातील योगदान :-

गेमाल अब्दुल नासीर यांच्यामुळे इजिप्त आज या स्थितीत असून आपण आज त्यांच्या योगदाना-बद्दल जाणून घेवूयात.

⦿ सैन्य प्रवेश :-

१९३७ ला त्यांनी ब्रिटीश आधिपत्याखालील इजिप्त च्या सैन्यात प्रवेश घेतला. त्यांचे प्रमुख ध्येय हे इजिप्तची ब्रिटीशांपासून मुक्ती हे होते.

⦿ Free Officers -

फ्री आफिसर्स या संघटनेची स्थापना करुन त्यांनी इजिप्त मध्ये राजकीय क्रांती घडवून आणून ब्रिटीश शासन उलथवून दिले.

⦿ सैन्य हकालपट्टी :-

त्यांनी सत्तेची सर्व सुत्रे हातात घेवून इजिप्त ची अर्थव्यवस्था स्वतंत्र करुन इजिप्ताचा विकास करण्यासाठी ब्रिटीश सैन्याची इजिप्त मधून हकालपट्टी केली. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते निवडून येवून ते राष्ट्राध्यक्ष बनले.

| Q. No. | | | TOTAL | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | |



Q. No.

⊙ अरब राष्ट्रवाद -

अरब राष्ट्रवादाचे जनक असलेल्या नासीर यांनी ब्रिटीश जोखडातून मुक्ततेसाठी अरब राष्ट्रांना प्रेरित करून पाठबळ दिले, त्यासाठी संघटना ही स्थापन केली. मात्र हा प्रयत्न जास्त चालला नसला तरी अरब राष्ट्रवादाचा हेतू सफल झाला.

⊙ सुएझ कालवा -

त्यांनी सुएझ कालव्याच्या राष्ट्रीयीकरणाचा धाडसी निर्णय घेवून इजिप्तच्या आर्थिक विकासाला बळ देण्याचे कार्य केले.

⊙ विकास -

भूमिहीन मजूर यांना जमिनीचे वाटप केले पायाभूत सुविधांचा विकास केला, जनतेत बेरोजगारी दूर करण्यासाठी खास प्रयत्न केले.

⊙ आक्रमण -

सुएझ कालव्यावर नियंत्रणासाठी फ्रान्स, इस्त्राईल, ब्रिटन यांनी आक्रमण केले असता, त्यांनी अत्यंत धीरोदात्तपणे आक्रमणाचा सामना करून जागतिक पातळीवर आपल्या सक्षमतेचा संदेश दिला.

⊙ पॅन-आफ्रिकानिझम -

पॅन-आफ्रिकानिझमला चालना देवून पॅन आफ्रिकानिझमचे समर्थक होवून नासीर यांनी

Q. No.

आफ्रिका खंडात याचा मोठा प्रचार आणि प्रसार केला, त्यांच्या या कृतीमुळे आफ्रिका खंडातील निवसाहतीकरणा ला पाठबळ मिळाले. आफ्रिकेतील राष्ट्रांचे स्वातंत्र्य-युद्ध तीव्र झाले.

त्यांनी कधी शांतता तर कधी युद्धांच्या मार्गाचा अवलंब करून, इजिप्तच्या स्थैर्याला आणि विकासाला प्राधान्य दिले.

Sadguru Gadge Maharaj College, Karad
Education through self help is our motto

| Q. No. | | | | TOTAL | | | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Marks | | | | | | | | |

| Q. No. | |
|---|---|
| | |

SADGURU GADGE MAHARAJ COLLEGE, KARAD
Education through self help is our motto